# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागाचा अभिनव उपक्रम!

## तृतीय पंथी नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन !




कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागामार्फत तृतीय पंथी नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन काल करण्यात आले होते ,यामध्ये महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत मोफत टी.बी, एच आय व्ही, एच बी टी, एक्स रे तपासणी करण्यात आली . आशा वर्कर यांनी आयुष्मान कार्ड, आभा कार्ड याबाबत मोफत सेवा दिली. वुमन्स वेलफेअर फाऊंडेशन संस्थेमार्फ़त मोफत समुपदेशन करण्यात आले,तसेच फोर्टिज हॉस्पिटल यामार्फत ब्लड शुगर, रक्त तपासणी अशा वेगवेगळ्या पद्धतीची आरोग्य तपासणी करण्यात आली. महापालिकेमार्फत तृतीय पंथी नागरिकांसाठी मोफत अन्न धान्य वाटपही करण्यात आले. यावेळी महापालिका उप आयुक्त, कांचन गायकवाड, शिक्षण समिती सदस्य प्रतीक पेणकर, शिक्षण समिती सदस्य जतीन प्रजापती, आरोग्य विभागाच्या शहर क्षयरोग अधिकारी डॉ.पौर्णिमा ढाके,समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर, वुमन्स वेलफेअर फाऊंडेशनच्या संचालिका मिनाक्षी उज्जैनकर व किन्नर अस्मिता सदस्य सिमरन केणे,किन्नर समुदायाचे इतर मान्यवर, महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे वेळी १६० हुन अधिक तृतीय पंथी यांची तपासणी करण्यात आली.

# खा. संजय दिना पाटील यांचा मुंबई उपनगरीय रेल्वे सुरक्षेच्या प्रश्नावर जोरदार आवाज



**मुंबई:अजय उपाध्याय**

मुंबई उपनगरीय रेल्वेतील वाढत्या सुरक्षेच्या समस्या, प्रवाशांची गैरसोय आणि प्रशासनातील निष्क्रियतेबाबत केंद्रीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य खा. संजय दिना पाटील यांनी नवी दिल्ली येथे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत जोरदार आवाज उठवला। लोकलमधील प्रचंड गर्दीमुळे धक्काबुक्की, वाद आणि अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. मालाड येथे २४ जानेवारी २०२६ रोजी घडलेल्या घटनेचा उल्लेख करत, सीसीटीव्ही वाढवणे व आरपीएफ जवानांची संख्या वाढवण्याची मागणी त्यांनी केली। महिलांच्या सुरक्षेचा मुद्दाही त्यांनी गंभीरपणे उपस्थित केला. डिसेंबर २०२५ मधील एमएस-सीएसएमटी सुपरफास्ट एक्सप्रेसमधील गैरवर्तनाच्या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई व उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्यात आली। भांडुप, घाटकोपर, मुलुंड, दादर आणि ठाणे स्थानकांवरील प्लॅटफॉर्म आणि ट्रेनमधील धोकादायक अंतर कमी करण्यासाठी प्लॅटफॉर्म उंची वाढवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच सणासुदीत अतिरिक्त गाड्या सुरू करणे, बंद असलेल्या रत्नागिरी-दादर पॅसेंजर व सह्याद्री एक्सप्रेस पुन्हा सुरू करण्याची मागणी केली।

रेल्वेतील रिक्त पदे तातडीने भरणे, पारदर्शक भरती प्रक्रिया राबवणे आणि कर्मचाऱ्यांना आधुनिक प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. शेवटी, एआय आधारित सुरक्षा व मेंटेनन्स प्रणाली लागू करून प्रवाशांची सुरक्षा सर्वोच्च प्राधान्य ठरवावी, असे त्यांनी स्पष्ट केले।

# श्रीराम महाजन यांचे "माझे अक्षर, माझी ओळख" पुस्तकांचे प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न




**उरण :सुनिल ठाकूर**

अक्षरसाधना पब्लिकेशन प्रकाशित श्रीराम साहेबराव महाजन लिखित 'माझे अक्षर, माझी ओळख' पुस्तक प्रकाशन सोहळा चेंबूर कर्नाटका हायस्कूल मध्ये उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमांची सुरुवात दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली, चेंबूर कर्नाटका हायस्कूलच्या विदयार्थ्यांनी स्वागत गीताने कार्यक्रमास आलेल्या पाहुण्याचे स्वागत केले. गणेश वंदना, गुरुवंदना, लावणी नृत्यांनी कार्यक्रमाची जल्लोषात सुरुवात करण्यात आली. त्यांनतर महाजन सरांचा जीवन प्रवास यावर डॉक्युमेंटरी फिल्म दाखवण्यात आली. आलेल्या पाहुण्याचा परिचय सुप्रसिद्ध सूत्रसंचालिका अनघा जाधव यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत श्रीराम महाजन व मेघा महाजन यांनी सन्मानचिन्ह, शाल, पेपर बुके, पुस्तक देऊन केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत एस. नाईक (अध्यक्ष, चेंबूर कर्नाटका संघा), डॉ. गणेश तरतरे.(सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, माजी प्राध्यापक/प्रसिद्ध चित्रकार/लेखक), डॉ. गजानन सिताराम शेपाळ ( चित्रकार/रंग चिकित्सक/प्रकाशक/लेखक ), राम कस्तुरे ( आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सुलेखनकार ), सु.बा.माळी ( सेवानिवृत्त, शिक्षण उपसंचालक आयुक्त कार्यालय, पुणे महाराष्ट्र ), डॉ. गीतांजली सालियन (प्राचार्या, चेंबूर कर्नाटका हायस्कूल, चेंबूर मुंबई) उपस्थित होते. तसेच शाळेचा उपप्राचार्या अर्चना पुजारी, पर्यवेक्षिका निशा विश्वकर्मा, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, कला शिक्षक, पत्रकार, कवी, लेखक , आजी व माझी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रीराम महाजन यांनी पुस्तकांविषयी संपूर्ण माहिती त्यांच्या मनोगतात व्यक्त केली. हे पुस्तक माझे संपूर्ण जीवन, कला प्रवास त्यांच्या संपन्नतेची व समाधानाची वाटचाल करीत आहे. ते माझे वडिल (नाना) कै. साहेबराव रामचंद्र महाजन यांच्या पवित्र स्मृतीस व आई श्रीमती द्वारकाबाई महाजन यांच्या चरणी त्यांनी अर्पण केले. नवीन पिढी अक्षरांपासून दूर चालली आहे, त्यांना पुन्हा एकदा अक्षरांचे ओळख व्हावी, त्यांचे अक्षर स्वच्छ, सुंदर, कळणदार व्हावे यासाठी हे पुस्तकांची निर्मिती केली आहे, असे लेखन महाजन सरांनी यावेळी बोलतांना सांगितले. सर्व प्रमुख पाहुण्यांनी पुस्तकांविषयी सुरेख आपली मते मांडली राम कस्तुरी यांनी अक्षर लेखनावर सुंदर माहिती दिली. हर्षाली नलावडे व संग्राम इंगळे या विद्यार्थ्यांनी सरांविषयी सुंदर अशी माहिती आपल्या भाषणात दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनघा जाधव यांनी केले. आभार प्रदर्शन मेघा महाजन यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रमोद कुरणे, गजानन पाटील, राजू आवाडे, जितेंद्र आहिरराव, समाधान रोकडे यांनी अधिक परिश्रम घेतली.

## PUBLIC NOTICE

KNOW ALL MEN BY THESE PRESENTS that my client **Mr. Narendra Dwarkadas Johar** is lawful owner of Flat No. 505, C-Wing, 5th Floor, Montana CHS. Ltd., Plot No. 4, 2nd Cross Road, Lokhandwala Complex, Andheri (West), Mumbai - 400053, adm. 380 Sq. Ft. Built-up area equivalent to 35.303 Sq. Mtrs. Built-up Area, holding Share Certificate No. 121 under Dist. No. 601 to 605 in his name. That original Chain Agreement i.e. Agreement dt. 23.11.1990, executed by and between Mr. Vimal Lakhani and Mr. Sheriff Hassan Kalmadi in respect of said Flat premises is lost / misplaced by my client **Mr. Narendra Dwarkadas Johar** and in that regard he has lodged online Lost Report bearing No. 42327/2026 dt. 28.03.2026 with Oshiwara Police Station.

Any person who finds the above said original Agreement should intimate to the undersigned within **7** days from the date of publication of this notice.

Place : Mumbai Date : 29.03.2026

**ANUP KUMAR PAL** (Advocate High Court)
Office : Andheri Court Bar Room, 3rd Floor, Andheri (East), Mumbai - 400069.
Mobile No. 8928594895 / 8291198079

# ठामपाचा अर्थसंकल्प हा मूलभूत सुविधांचा नाही तर सुखसुविधांचा

**ठाणे** - स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या परिक्षेत्रातील गोरगरीब जनतेचे जीवनमान उंचवायला हवे. त्यासाठीच अर्थसंकल्प मांडण्यात येत असतो. मात्र, ठाणे महानगर पालिकेकडून मांडण्यात आलेला अर्थसंकल्प हा उच्चभ्रूंना सुखसुविधा पुरविणारा आहे. मूलभूत सुविधा पुरवणारा नाही, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक सुधीर भगत यांनी लगावला. तसेच, एक हजार कोटी रूपयांच्या उत्पन्न वाढीचा मुलमंत्रही भगत यांनी दिला. ठाणे महानगर पालिकेच्या अर्थसंकल्पावर शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत चर्चा झाली. या चर्चेत सुधीर भगत यांनी प्रशासकीय यंत्रणांवर जोरदार हल्लाबोल केला. सुधीर भगत यांनी आपल्या 20 मिनिटांच्या भाषणात, ठामपाच्या उत्पन्न वाढीवर भर तर दिलाच शिवाय मूलभूत सुविधांबाबत दाखविलेल्या अनास्थेवरही भाष्य केले. ते म्हणाले , मुंब्रा प्रभाग समितीमध्ये शंभरच्या आसपास नवीन अनधिकृत इमारती आहेत. या इमारतीत राहणारे लोक पालिकेच्या सर्व सुविधा वापरत आहेत. मात्र, त्यांना करआकारणी करण्यात आलेली नाही. या इमारतींना कर आकारणी करण्यासाठी मे. स्थापत्य कन्सल्टन्सी या कंपनीला कंत्राट दिले आहे. मात्र, कर आकेरणीचे स्पष्ट आदेश दिलेले नाहीत. जर पाणी आणि कर आकारणी केली तर सुमारे 100 कोटीची गंगाजळी ठामपाच्या तिजोरीत जमा होईल. ठामपाच्या 9 प्रभाग समित्यांमध्ये अशी कार्यवाही केली तर 900 कोटी रूपयांचे उत्पन्न ठामपाला मिळेल. शिवाय, रस्ते रुंदीकरण आपण केले आहे. पण, पार्किंग धोरण आपण आखलेले नाही. हे धोरण जर आखले तर आताच्या 35 कोटी उत्पन्नात थेट 65 कोटींची भर पडून ते 100 कोटींवर जाऊ शकते. याचा विचार ठामपा आयुक्तांनी केलाच पाहिजे.

## PUBLIC NOTICE

REDEVELOPMENT TENDER NOTICE Sealed tenders are invited from reputed developers for the redevelopment of CHARKOP SATSANG CHS LTD Plot 222, sector 4, RDP 8, Charkop, Kandivali West – Mumbai 400067
Reg No: BOM(WR) HSG /(TC)3549 /1988-89 DT:12.10.1988
Plot Area: 817.40 sqmtrs
Existing Members: 16 flats + 4 shops
Non refundable Tender Fees Rs.2000/- to be deposited in Bank Account Number: 069200100019969
IFC code: SRCB0000069 Bank: Saraswat Bank Charkop Branch
In name of: M/s Charkop Satsang CHS Ltd
The Tender documents can be collected from the below society committee member after submitting the receipt / payment copy deposited in Bank Tender submission last date is 15th April 2026 Mrs Borge 9819680097 A/204, CHARKOP SATSANG CHS LTD, plot no 222, sector no 4. RDP 8, Charkop, Kandivali West – Mumbai 400067

**FROM:**
**Charkop Satsang CHS LTD**
**Secretary**
Dated:28/03/2026

## जाहीर सूचना

सदरद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, सदनिक क्रमांक ०२, भूतळ/पहिला मजला, बी विंग, एस.बी.आय. स्टाफ तृप्ती सी.एच.एस. लि., ६, सीझर रोड, व्ही.एल. सावंत मार्ग, अंबोली, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०००५८, सी.टी.एस. क्रमांक ७३९, ७३९/१ ते ७३०/११ गाव आंबिवली ,ता - अंधेरी -मुंबई ही मालमत्ता (यापुढे "सदर सदनिका" म्हणून उल्लेखित) यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

१) सदर सदनिकेचा मूळ विक्री करार, जो श्री. चिंतामन रघुनाथ काणिटकर यांनी श्री. मोतीराम बिडाये यांच्या नावे विक्री व हस्तांतरण केला होता, तो हरवलेला/गहाळ झालेला असून शोधूनही सापडत नाही.

२) सदर सदनिकेचे मूळ शेअर सर्टिफिकेट क्रमांक ६ (शेअर क्रमांक २६ ते ३०) तसेच शेअर सर्टिफिकेट क्रमांक ३१ (शेअर क्रमांक ५०१ ते ५७५), जे एस.बी.आय. स्टाफ तृप्ती सी.एच.एस. लि. यांनी जारी केलेले आहेत, ते हरवलेले/गहाळ झाले असून शोधूनही सापडत नाहीत.

३) सध्या श्री. दिलीपकुमार घीसाराम चौधरी हे सदर सदनिका खरेदी करण्याचा इरादा बाळगतात.

म्हणून सर्व बँका, वित्तीय संस्था, व्यक्ती, बांधकाम व्यावसायिक, सोसायट्या इत्यादींना विनंती करण्यात येते की, सदर सदनिकेबाबत कोणताही हक्क, दावा, आक्षेप किंवा स्वारस्य असल्यास त्यांनी त्यासंबंधी पुराव्यासह लेखी माहिती खाली सही करणाऱ्या वकील किंवा त्यांच्या ग्राहकास, या जाहिरातीच्या प्रसिद्धीपासून १४ दिवसांच्या आत कळवावी. अन्यथा, सदर मालमत्तेबाबत कोणताही दावा/आक्षेप नसल्याचे गृहित धरले जाईल.

**सही/-**
**वसीम जमशेर शेख**
**ॲडव्होकेट, मुंबई उच्च न्यायालय**
स्थळ: मुंबई कुर्ला (प.), मुंबई – ४०००७०
दिनांक:२९/०३/२०२६ मो. ९८६०७८६०३०

## जाहीर नोटीस

नोंद घ्यावी की खाली नमूद केलेला फ्लॅट श्री. श्रीनिवास अगम्मय्या गुंडापिल्ले आणि श्रीमती विजयलक्ष्मी श्रीनिवास गुंडापिल्ले यांनी मे. श्री. गजानन बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांच्याकडून दि.14.01.2015 (नों. क्र. UHN-3-545/5015) रोजीच्या विक्री करारनाम्यानुसार संयुक्तपणे खरेदी केला होता. तर, श्रीनिवास अगममय्या गुंडापिल्ले यांचे दि. 06.10.2021 रोजी मृत्युपत्र न करता निधन झाले. त्यांच्या पश्चात श्रीमती विजयालक्ष्मी श्रीनिवास गुंडापिल्ले (पत्नी), श्री कार्तिक श्रीनिवास गुंडापिल्ले (मुलगा), श्री. मोहन श्रीनिवास गुंडापिल्ले आणि मिस स्नेहा श्रीनिवास गुंडापिल्ले) (मुलगी) हे हयात असलेले कायदेशीर वारस आहेत. तर, सदर फ्लॅट कोणत्याही बोज्यांपासून मुक्त असल्याचा दावा सदर वारसांनी केला आहे.

जर कोणत्याही व्यक्ती / व्यक्तींना, शासकीय प्राधिकरणाला किंवा संस्थेला आणि / किंवा वित्तीय संस्थेला कै. श्री. श्रीनिवास अगम्मय्या गुंडापिल्ले यांच्या कायदेशीर वारसा हक्कावर आक्षेप असेल, किंवा सदर फ्लॅटमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये वारसा, गहाण, देणगी, ताबा, विक्री इत्यादी मार्गांनी कोणताही हक्क, मालकी किंवा हितसंबंधाचा दावा करत असेल, तर त्यांनी आपल्या दाव्याचे स्वरूप पुराव्यासह लेखी स्वरूपात, या सूचनेच्या प्रकाशनापासून 15 दिवसांच्या आत, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोस्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला कळवावे. असे न केल्यास, असे गृहीत धरले जाईल की कोणतेही दावे नाहीत आणि जर काही आढळले, तर ते सोडून देण्यात आले आहेत / हेतुपुरस्सर दावा न करता सोडून दिले आहेत. त्यानंतर केलेले कोणतेही दावे किंवा आक्षेप अवैध मानले जातील.

**मालमत्तेचे वर्णन**

फ्लॅट क्र. 202, क्षेत्र 790 चौ. फू. (बिल्ट अप), 2 रा मजला, श्री. गजानन रेसिडेन्सीच्या दिनकर विहार इमारतीच्या 'बी' विंग मध्ये, सर्व्हे क्र. 19 हिस्सा क्र. 4, गाव आडिवली ढोकळी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे.

**सही**
**वकील श्री. अमित घाडगे.**
पत्ता- बी 101, उषा कमर्शियल कॉम्प्लेक्स, वलीपीर रोड, कल्याण प. ठाणे.
मोबाईल 8655278884

## जाहीर नोटीस

तमाम सर्व लोकांस याद्वारे कळविण्यात येते की, आमचे अषिलानी मौजे कणेरी अशोक नगर भागातील बिल्डिंग नं 11 मधील बिल्डिंग नं 11 को ऑप सोसायटी या इमारतीमधील, तळमजला, ए विंग, दुकान गाळा नं 02, क्षेत्र 365 चौ फूट कार्पेट मालक स्वाती मेहरा व इतर यांचे कडून कायम विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमिनीवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लीज, बक्षीस पत्र, खरेदी विक्री, व इतर कुठल्याही प्रकारचा हक्क असल्यास त्याने निम्नस्वाक्षरीकारांस खालील पत्त्यावर ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 07 दिवसांत लेखी योग्य पुराव्यासह कळवावे. तसे न केल्यास कुणाचाही सदर जागेत कुठल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नाही वा असल्यास त्याने तो सोडुन दिला आहे, असे समजुन सदर व्यवहार पूर्ण करण्यात येईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**कळावे,**
**खरेदीदारांचे वकील**

**कार्यालयीन पत्ता :-**
**ॲड. श्री निलेष एच. पाटील,**
गाळा नं. 2, यशोदा अपार्टमेंट, प. रा. विदयालय जवळ, ब्राम्हण आळी, भिवंडी, जिल्हा ठाणे

## जाहीर नोटीस

सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की सिद्धी राकेश दंडवते, राहणार : दुर्गा निवास चाळ, प्रताप नगर रोड, भांडुप (पश्चिम)., अर्जदार सिद्धी राकेश दंडवते यांचा जन्म दिनांक २१/०१/२००६ रोजी त्यांचे राहते घरी दुर्गा निवास चाळ, प्रताप नगर रोड, भांडुप (पश्चिम)., येथे झालेला आहे. काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे जन्मची नोंद दफ्तरी करुन जन्मचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काहीवैयक्तीक कारणांसाठी त्यांच्या स्वतःच्या जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. सदर प्रमाणपत्रासाठी मी संबंधित प्राधिकरणाकडे अर्ज केला असून कागदपत्रे व पुरावे अर्जासोबत जोडले आहेत.

उशीरा जन्मचा नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास अर्ज क्र. ११२/२५ दि. १४/०५/२०२५ दाखल केला आहे.

या संदर्भात कोणाला काही हरकती किंवा कायदेशीर आक्षेप असल्यास, त्यांनी सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत, कार्यकारी दंडाधिकारी आणि तहसीलदार कुर्ला (मुलुंड) येथे आपल्या हरकतीसंबंधी सर्व आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा कोणतीही हरकत नाही आणि कोणताही दावा, हक्क किंवा स्वारस्य नाही असे मानण्यात येईल.

सही/-
सिद्धी राकेश दंडवते,
दुर्गा निवास चाळ, प्रताप नगर रोड,
भांडुप (पश्चिम).,

# ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लि.

ACRE — MAKING ASSETS WORK

**नोंदणीकृत कार्यालय :** १४ वा मजला, इरोस कॉर्पोरेट टॉवर, नेहरू प्लेस, नवी दिल्ली - ११००१९ दूरध्वनी : ९१-११-४३११५६००, फॅक्स : ९१-११-४३११५६१८
**कॉर्पोरेट कार्यालय :** युनिट क्र. ५०२, सी विंग, वन बीकेसी, रेडियस डेव्हलपर्स, प्लॉट क्र. सी-६६, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई – ४०००५१
दूरध्वनी : ०२२-६८६४३१०१ ई-मेल : acre.arc@acreindia.in वेबसाइट : www.acreindia.in **CIN :** U65993DL2002PLC115769

## परिशिष्ट IV-A
## स्थावर मालमत्तांच्या विक्रीबाबतची विक्री सूचना

अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ मधील नियम ८(६) व ९(१) च्या तरतुदींनुसार.

याद्वारे सर्वसामान्य जनतेस तसेच विशेषतः कर्जदार, सह-कर्जदार, गहाणदार व हमीदार यांना कळविण्यात येते की खाली वर्णन केलेल्या अचल मालमत्ता या **मूळ कर्जदाता/असाइनर बँकेकडे** गहाण/तारण ठेवण्यात आलेल्या होत्या. तसेच सदर मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा असाइनर बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी असाइनमेंटपूर्वीच घेतलेला आहे.** सदर मालमत्ता नंतर **ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लि.** [CIN: U65993DL2002PLC115769] **("सिक्युअर्ड क्रेडिटर")** यांना हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आता सिक्युअर्ड क्रेडिटर हे कर्जदार, सह-कर्जदार, गहाणदार व हमीदार यांच्याकडून देय असलेल्या रकमेची वसुली करण्यासाठी खाली नमूद केलेल्या मालमत्तांची विक्री "जशी आहे जिथे आहे", "जशी आहे तशी" आणि "जसे काही आहे तसे" या तत्त्वावर ई-लिलावाद्वारे करणार आहेत. प्रत्येक मालमत्तेसाठी खाली नमूद केलेली राखीव किंमत व अनामत ठेव लागू राहील.

**सुरक्षित मालमत्तेचे तपशील**

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक आणि एसीआरई ट्रस्ट चे नाव | कर्जदार/सह-कर्जदार/तारणदार/जामीनदारांची नावे | एकूण थकीत रक्कम | राखीव किंमत (रु.) | अग्रिम रक्कम (ईएमडी) (रु.) | डिमांड ड्राफ्ट/आरटीजीएस/एनईएफटी द्वारे ईएमडी भरण्यासाठी बँकेच्या खात्याचा तपशील | लिलावाची तारीख आणि वेळ | ईएमडी भरण्याची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | H405HLD0984265 / H405HLT0994608 एसीआरई १७८ ट्रस्ट | विजयभान मंचंद्र चौहान (कर्जदार) इंदा विजयभान चौहान (सह-कर्जदार) | रु. ३०,७८,३८१.१८/- (अक्षरी: तीस लाख अठ्ठयाहत्तर हजार तीनशे एक्क्याऐंशी रुपये आणि अठरा पैसे मात्र) दिनांक २८.०३.२०२६ रोजीची रक्कम; तसेच प्रत्यक्ष भरणा व वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू होणारे व्याज, शुल्क आणि खर्च यासह. | रु. ८,५०,०००/- (अक्षरी: आठ लाख पन्नास हजार रुपये मात्र) | रु. ८५,०००/- (अक्षरी: पंचाऐंशी हजार रुपये मात्र) | खात्याचे नाव : एसीआरई १७८ ट्रस्ट खात्याचा क्रमांक : ०९०११०२००००४२६१७ बँक : IDBI Bank आयएफएससी : IBKL0000901 | २९ एप्रिल २०२६, दुपारी २:३० ते ३:३० या वेळेत | २८ एप्रिल २०२६, सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत |
| | **सुरक्षित मालमत्तेचे वर्णन:** फ्लॅट क्र. ४०१, बी-विंग, इमारत टाईप–१, संबंधित मजल्यावर स्थित असून त्याचे कार्पेट क्षेत्रफळ २६.१३७ चौ.मी. आहे. सदर क्षेत्रफळामध्ये सामाईक भाग व सुविधांच्या प्रमाणानुसार असलेला हिस्सा समाविष्ट आहे. तसेच सुमारे २.४३० चौ.मी. इतका कॉमन भागाचा प्रमाणानुसार हिस्सा आणि २.४०० चौ.मी. इतके विशेष बाल्कनी क्षेत्रफळ या फ्लॅटला संलग्न आहे. सदर फ्लॅटसोबत फ्लॉवर बेड, कपाटे, ड्राय बाल्कनी, निचेस (असल्यास) तसेच खुल्या टेरेसचा वापर, ताबा व उपभोग करण्याचा हक्क देखील मिळतो. ही मालमत्ता द मॉर्निंग प्रोजेक्ट या नावाने ओळखल्या जाणाऱ्या बांधकाम योजनेत स्थित असून ती सर्व्हे क्र. १२७, प्लॉट क्र. ३, गाव धामोटे, ता. कर्जत, जि. रायगड, महाराष्ट्र येथे आहे. सदर फ्लॅटचा तपशील संबंधित मजल्याच्या आराखड्यानुसार दर्शविण्यात आलेला आहे. | | | | | | | |
| २ | 102MSM001021078 एसीआरई १८८ ट्रस्ट | किशन सिंग गजेंद्र सिंग खरवड (कर्जदार), भेरू सिंग उदय सिंग खरवड (सह-कर्जदार) | रु. १६,५०,६७१.३९ /- (रुपये सोळा लाख पन्नास हजार सहाशे एकाहत्तर पॉईंट तीन नऊ फक्त) दिनांक २८.०३.२०२६ रोजीची रक्कम; तसेच प्रत्यक्ष भरणा व वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू होणारे व्याज, शुल्क आणि खर्च यांसह | रु. ५,१५,०००/- (रुपये पाच लाख पंधरा हजार फक्त) | रु. ५१,५००/- (रुपये एकावन्न हजार पाचशे फक्त) | खात्याचे नाव : एसीआरई १८८ ट्रस्ट खाते क्रमांक : 11050200043471 बँक : फेडरल बँक आयएफएससी : FDRL0001105 | २९ एप्रिल २०२६, दुपारी २:३० ते ३:३० या वेळेत | २८ एप्रिल २०२६, सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत |
| | **सुरक्षित मालमत्तेचे वर्णन :** गाव शेलू, ता. कर्जत, जि. रायगड येथे सर्व्हे क्र. ५२/१/सी तसेच गौठाण ग्रामपंचायत घर क्र. ८५७ए वर बांधलेल्या साई कृपा अपार्टमेंट या इमारतीतील ए-विंगच्या भुईमजल्यावर असलेले सुमारे १२६ चौ.फूट बांधकाम क्षेत्रफळाचे दुकान क्र. ०२ अशी सर्व ती मालमत्ता. चतु:सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस: निवासी इमारत, पश्चिमेस: साई धाम अपार्टमेंट, उत्तरेस: बी-विंग, दक्षिणेस: अंतर्गत रस्ता | | | | | | | |
| ३ | 606339211152776 एसीआरई १७८ ट्रस्ट | प्रशांत दिलीप कदम (कर्जदार), मयूर प्रशांत कदम (सह-कर्जदार) | रु. २०४८०९४.४३/- (रुपये वीस लाख अठ्ठेचाळीस हजार चौऱ्याण्णव पूर्णांक त्रेचाळीस फक्त) दिनांक ३१.१०.२०२५ रोजी, सोबत लागू होणारे व्याज, शुल्क आणि खर्च, परतफेड आणि वसुलीच्या तारखेपर्यंत | रु. ९,२०,०००/- (रुपये नऊ लाख वीस हजार फक्त) | रु. ९२,०००/- (रुपये ब्याण्णव हजार फक्त) | खात्याचे नाव : एसीआरई १७८ ट्रस्ट खात्याचा क्रमांक : ०९०११०२००००४२६१७ बँक : IDBI Bank आयएफएससी : IBKL0000901 | २९ एप्रिल २०२६, दुपारी २:३० ते ३:३० या वेळेत | २८ एप्रिल २०२६, सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत |
| | **सुरक्षित मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट क्र. ३०५, तिसरा मजला, सुमारे ३४.६६ चौ. मीटर (कार्पेट क्षेत्रफळ) असलेली सर्व ती मालमत्ता, जी हिल क्रेस्ट अपार्टमेंट या इमारतीमध्ये स्थित आहे. सदर इमारत सर्व्हे क्र. १७५, हिस्सा क्र. १७५, प्लॉट क्र. २२, क्षेत्रफळ ५०२.०० चौ. मीटर असलेल्या जमिनीवर बांधलेली असून ती ममदापुर येथे स्थित आहे. ही मालमत्ता कर्जत नगर परिषदच्या हद्दीत, ता. कर्जत, जि. रायगड, महाराष्ट्र राज्य येथे येते आणि उप-नोंदणी अधिकारी, कर्जत यांच्या अधिकार क्षेत्रात येते. तसेच सदर फ्लॅटसह संबंधित जमिनीतील प्रमाणानुसार अविभाजित हिस्सा तसेच त्यास जोडलेले सर्व हक्क, सुलभता हक्क व इतर उपयुक्त हक्क यांचा समावेश आहे. | | | | | | | |
| ४ | 606439211065192 एसीआरई १७८ ट्रस्ट | सागर औदुंबर रणशिंग (कर्जदार), दीपाली दिलीप भालेराव (सह-कर्जदार) | रु. २२,८९,३८१/- (रुपये बावीस लाख एकोणनव्वद हजार तीनशे एक्क्याऐंशी फक्त) दिनांक ३१.१०.२०२५ रोजीची रक्कम; तसेच प्रत्यक्ष परतफेड व वसुलीच्या दिनांका पर्यंतचे लागू होणारे व्याज, शुल्क आणि खर्च यांसह | रु. ११,२५,०००/- (रुपये अकरा लाख पंचवीस हजार फक्त) | रु. १,१२,५००/- (रुपये एक लाख बारा हजार पाचशे फक्त) | खात्याचे नाव : एसीआरई १७८ ट्रस्ट खात्याचा क्रमांक : ०९०११०२००००४२६१७ बँक : IDBI Bank आयएफएससी : IBKL0000901 | २९ एप्रिल २०२६, दुपारी २:३० ते ३:३० या वेळेत | २८ एप्रिल २०२६, सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत |
| | **सुरक्षित मालमत्तेचे वर्णन:** फ्लॅट क्र. ३०५, तिसरा मजला, ३४.६६ चौ. मीटर (कार्पेट क्षेत्रफळ) असलेली सर्व ती मालमत्ता, जी हिल क्रेस्ट अपार्टमेंट या इमारतीत स्थित आहे. सदर इमारत सर्व्हे क्र. १७५, हिस्सा क्र. १७५, प्लॉट क्र. २२, क्षेत्रफळ ५०२.०० चौ. मीटर असलेल्या जमिनीवर बांधलेली असून ती ममदापुर येथे स्थित आहे. ही मालमत्ता कर्जत नगर परिषदेच्या हद्दीत येते, ता. कर्जत, जि. रायगड, महाराष्ट्र राज्य. सदर मालमत्ता उप-नोंदणी अधिकारी, कर्जत यांच्या अधिकार क्षेत्रात येत असून, या फ्लॅटसोबत जमिनीतील प्रमाणानुसार अविभाजित हिस्सा तसेच त्या संबंधित सर्व हक्क, सुलभता हक्क व इतर संलग्न अधिकार यांचा समावेश आहे. | | | | | | | |
| ५ | 101MSM001021700 /102MSM001031230 एसीआरई १८८ ट्रस्ट | विजय जिभाऊ पगार (कर्जदार), संगिता पाटील (सह-कर्जदार) | रु. १३,४१,४२५.८४/- (अक्षरी: तेरा लाख एकचाळीस हजार चारशे पंचवीस रुपये आणि चौऱ्याऐंशी पैसे मात्र) दिनांक २८.०३.२०२६ रोजीची स्थितीनुसार; तसेच, प्रत्यक्ष परतफेड व वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू होणारे व्याज,शुल्क आणि खर्च यांसह. | रु. ७,८५,०००/- (अक्षरी: सात लाख पंच्याऐंशी हजार रुपये मात्र) | रु. ७८,५००/- (अक्षरी: अठ्ठयाहत्तर हेजार पाचशे रुपये मात्र) | खात्याचे नाव : एसीआरई १८८ ट्रस्ट खाते क्रमांक : 11050200043471 बँक : फेडरल बँक आयएफएससी : FDRL0001105 | २९ एप्रिल २०२६, दुपारी २:३० ते ३:३० या वेळेत | २८ एप्रिल २०२६, सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत |
| | **सुरक्षित मालमत्तेचे वर्णन:** 'शिव सृष्टी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील, 'ई-विंग'च्या दुसऱ्या मजल्यावर स्थित असलेला, अंदाजे २८.५० चौरस मीटर (कार्पेट क्षेत्रफळ) इतके क्षेत्रफळ असलेला, फ्लॅट क्रमांक २०५ चा संपूर्ण भाग व हिस्सा. ही इमारत, मौजे बाडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील गट क्रमांक ५ आणि घर क्रमांक २ असलेल्या जमिनीवर उभारण्यात आली आहे. | | | | | | | |

**सुरक्षित मालमत्तेचे वर्णन:** प्लॉट क्रमांक १९ (पैकी – उत्तर बाजू) वर बांधलेले, ४७.४० चौरस मीटर क्षेत्रफळ असलेले आणि नवीन सर्वेक्षण क्रमांक ११९० (जुना सर्वेक्षण क्रमांक १६७ पैकी) चा भाग असलेले, एक निवासी घर (वाडा) असलेली संपूर्ण मालमत्ता; जी हिमतनगर गाव, तालुका हिमतनगर, जिल्हा साबरकांठा येथे, हिमतनगर येथील 'सवगढ गट ग्रामपंचायत' च्या स्थानिक हद्दीत स्थित आहे. या मालमत्तेसोबतच तिला संलग्न असलेले सर्व हक्क, सुखभोग आणि अनुषंगिक बाबींचाही समावेश आहे. या मालमत्तेच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्वेस ६.०० मीटर रुंदीचा रस्ता; पश्चिमेस मोकळी जागा आणि त्यानंतर प्लॉट क्रमांक ३२; उत्तरेस प्लॉट क्रमांक १८; आणि दक्षिणेस प्लॉट क्रमांक १९ (पैकी) चा उर्वरित दक्षिण भाग.

वर नमूद केलेले कर्ज खाते (किंवा खाती) त्यासोबतच सर्व अधिकार, हक्क, हितसंबंध, अंतर्निहित तारण (किंवा सुरक्षा), गहाण आणि/किंवा हमी (गॅरंटी) ज्यामध्ये वर उल्लेख केलेल्या स्थावर मालमत्तांचाही समावेश आहे, ते 'ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लि.' या संस्थेकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत; सदर संस्था ही, वर दिलेल्या रकान्यात स्पष्टपणे नमूद केलेल्या विविध विश्वस्त संस्थांची विश्वस्त म्हणून कार्य करत आहे.

**लिलाव प्रक्रियेबाबत महत्त्वाची माहिती**

| | | |
|---|---|---|
| | ईएमडी (अनामत रक्कम) चे पेमेंट डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटी द्वारे, वर नमूद केलेल्या बँक खात्यांच्या नावे केले जावे. | |
| | लिलावासाठीची संकेतस्थळ: | www.bankeauctions.com |
| | संपर्क तपशील: | रोहन सावंत - ९८३३१४३०१३, अक्षय हसिजा - ८०८०२३९६११, सुहास ठाकूर - ८९७६३७०१३८, जितेश सावंत - ९०८२५२२४५५ |
| | मालमत्तेची पाहणी केवळ पूर्व-नियुक्तीच्या आधारेच करता येईल. | |
| | विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी, कृपया www.acreindia.in किंवा www.bankeauctions.com या संकेतस्थळांना भेट द्या. | |

**दिनांक : २९.०३.२०२६**
**स्थळ : मुंबई**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लि.**